# आम्ही भारतीय मुले

## आपल्या संविधानाची प्रास्ताविका




लीला सेठ
बिंदिया थापर

वाचन पातळी ४

Original Story in English **'We, the Children of India The Preamble to our Constitution'** by Leila Seth
© Leila Seth, 2010

Illustrations: Bindia Thapar
© Bindia Thapar, 2010

Photographs on pages 6, 7, 13, 29, 30, 32-35 courtesy the Nehru Memorial Museum and Library, New Delhi
Photographs on pages 9, 12 courtesy the India International Centre Library, New Delhi

First Published in English by Puffin, Penguin Books India 2010

**'Aamhi Bhartiya Mule'** — Marathi Translation by Varsha Sahastrabudhye
Calligraphy on cover page and page 39 by Rajeev Kumar
© Pratham Books, 2013

Third Marathi Edition: 2016

ISBN: 978-81-8479-437-3

Typesetting and layout by: New Way Typesetters and Processors, Pune

Printed by: Aegean Offset Printers, Greater Noida

Published by: Pratham Books | **www.prathambooks.org**

**Registered Office:**
PRATHAM BOOKS
# 621, 2nd Floor, 5th Main, OMBR Layout
Banaswadi, Bengaluru 560 043
T: +91 80 42052574 / 41159009

**Regional Office:** New Delhi | T: +91 11 41042483

**The development of this book has been supported by**

**parag** Promoting innovative publishing in education
A SIR RATAN TATA TRUST INITIATIVE

All rights reserved.
No part of this publication may be reproduced or distributed in any form or by any means, or stored in a database or retrieval system, without the prior written permission of the publisher.

PRATHAM BOOKS

# आम्ही भारतीय मुले

## आपल्या राज्यघटनेची प्रास्ताविका


लेखन:

लीला सेठ





चित्रांकन:

बिंदिया थापर

मराठी अनुवाद:

वर्षा सहस्त्रबुद्धे

प्रिय मुलांनो,

भारतीय संविधानाच्या / राज्यघटनेच्या प्रास्ताविकेबद्दलचं हे पुस्तक मी तुमच्यासाठी लिहिलं आहे. पाच वर्षांची अनामिका आणि आठ वर्षांची नंदिनी या माझ्या नातींची ते लिहिताना मला मदत झाली.

चांगलं नागरिक असणं खूप महत्त्वाचं असतं असं आम्हाला वाटतं. (कोणत्याही देशात राहणाऱ्या लोकांना त्या देशाचे नागरिक म्हणतात.) राज्यघटनेतली उद्दिष्टं आपण पाळायला हवीत. 'प्रास्ताविका' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका लांबलचक वाक्यात ही उद्दिष्टं आहेत. चांगले नागरिक व्हायचं असेल तर आपल्याला ही प्रास्ताविका ज्या भावनेनं आणि विचारानं लिहिली गेली ती भावना समजून घ्यावयास हवी आणि तो विचार आपल्या वागण्याचा भाग बनून जायला हवा.



२०१० चा प्रजासत्ताक दिन — लीला सेठ

या पुस्तकातील चित्रं स्मितूला अर्पण केली आहेत शिवाय माओसाठी आणि अमितसाठीही आहेत.

बिंदिया थापर

खूप खूप वर्षं झाली. तुमचे आजी-आजोबा तेव्हा जन्मलेही नसतील. तेव्हा भारत देशात राहणं म्हणजे आत्तापेक्षा फारच वेगळी गोष्ट होती.

भारतातल्या लोकांना, तेव्हा, आवडेल त्याच्याशी बोलता येईलच किंवा आवडेल तिथे काम करता येईलच असं नव्हतं. एवढंच नाही, तर देशाचा कारभार चालवण्यासाठी कोणते नियम असावेत हे ठरवण्याचीही मुभा लोकांना नव्हती. कारण देश स्वतंत्र नव्हता. ब्रिटिशांच्या गुलामीत होता.

सगळं काही ब्रिटिश लोक ठरवीत. ते फार फार दुरून आले होते. ते व्यापारासाठी म्हणून आले, पण राज्यकर्ते म्हणून जवळजवळ दोनशे वर्षं राहिले.

विचार करणं, अभ्यास करणं आणि काम करणं यांच्या आपल्या पद्धती बदलण्याबाबत ब्रिटिशांनी केलेली जबरदस्ती बहुसंख्य भारतीयांना अजिबात रुचत नव्हती. काही अधिकाराच्या पदांवर काम करण्याची, काही ठिकाणी जाण्याची आपल्याला परवानगी नाही हेही त्यांना पसंत नव्हतं.

काही भारतीय एकत्र आले आणि ब्रिटिशांची हकालपट्टी कशी करता येईल, याबाबत त्यांनी विचारविनिमय केला. सुरुवातीला ब्रिटिशांशी लढण्यासाठी त्यांनी बंदुकींचा आणि इतर शस्त्रांचा वापर केला. काही जण जखमी झाले, काही मारले गेले, पण फारसं काही बदललं नाही.



मोहनदास करमचंद गांधींना आपण महात्मा गांधी म्हणून ओळखतो. त्यांचा जन्म १८६९ मध्ये गुजरातेत झाला. परिवर्तन करायचं असेल, तर सत्य, शांती आणि धैर्य यांचा अवलंब करणं हा सर्वांत उत्तम मार्ग आहे हे त्यांना आपल्या वयाच्या विशीतच समजलं. भारत स्वतंत्र व्हावा म्हणून धडपडणाऱ्या लोकांचे ते नेता बनले. लढून नव्हे, तर अहिंसेच्या मार्गानंच भारत स्वतंत्र होऊ शकेल असं त्यांनी सांगितलं. आपण भारतीयांनी स्वावलंबी बनायला हवं असंही त्यांनी सुचवलं. ते म्हणत, ''आपण स्वत: विचार करायला हवा, आणि ब्रिटिशांनी दिलेले आदेश जर गैर असतील, तर ते आपण पाळता कामा नये.''

*मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर चालताना बापू*







*१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री बोलताना जवाहरलाल नेहरू. आपल्या भाषणात त्यांनी 'दैवाशी भेट' हे सुप्रसिद्ध उद्‌गार काढले.*

पुष्कळ झगडल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत एक स्वतंत्र देश झाला. तेव्हापासून आपला देश स्वतंत्र आहे. म्हणजे, सरकारची निवड कशी होईल, त्याचं कामकाज कसं चालेल, आपलं आणि इतर नागरिकांचं जीवन अधिक चांगलं कसं होईल हे आपण, या देशातले लोक, म्हणजेच या देशाचे नागरिकच ठरवतो.



स्वतंत्र झाल्यावर काही गोष्टींना आपण मान्यता दिली

आपलं राष्ट्रगीत - जन गण मन



आपला राष्ट्रध्वज - तिरंगा

आपलं राष्ट्रीय चिन्ह






आपला राष्ट्रीय प्राणी



आपला राष्ट्रीय पक्षी



आपलं राष्ट्रीय फूल

'भारताची राज्यघटना' किंवा 'भारताचे संविधान' नावाचं एक राष्ट्रीय पुस्तकही आपण लिहिलं. आपला देश कार्यरत रहावा यासाठीचे सगळे विचार आणि नियम त्यात आहेत. आपल्या देशातलं हे सर्वांत महत्त्वाचं पुस्तक. त्याच्या सुरुवातीलाच प्रास्ताविका आहे. ही प्रास्ताविका म्हणजे घटनेचा प्राणच! त्यातून न्याय आणि समता यासारखी आपली राष्ट्रीय उद्दिष्टं निश्चित होतात. न्याय म्हणजे सर्वांशी योग्य आणि समान वागणं हा देशाचा सगळ्यात मूळ आणि मोठा कायदा आहे. या प्रास्ताविकेत काय म्हटलं आहे, आणि त्याचा अर्थ काय, ती कशी लिहिली गेली, कोणी लिहिली याविषयी आता बघू.

# THE CONSTITUTION OF INDIA

Preamble

WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:

JUSTICE, social, economic and political;

LIBERTY of thought, expression, belief, faith and worship;

EQUALITY of status and of opportunity;

and to promote among them all

FRATERNITY assuring the dignity of the individual and the unity of the Nation;

IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twenty-sixth day of November, 1949, do HEREBY ADOPT, ENACT AND GIVE TO OURSELVES THIS CONSTITUTION.

१९७७ च्या सुरुवातीला या प्रास्ताविकेत काही बदल केले गेले आणि त्यात **'समाजवादी'**, **'धर्मनिरपेक्ष'** आणि **'एकात्मता'** या शब्दांची भर घातली गेली.

तर आता प्रास्ताविका अशी आहे –




**प्रत्येक नागरिकाचे मूलभत अधिकार हा नेहमीच घटनेचा भाग होता, पण मूलभूत कर्तव्यांच्या विचाराची भर १९७७ च्या सुरुवातीला घातली गेली. आपल्या देशाचं रक्षण करणं, बंधुतेची जोपासना, वनं, तळी, नद्या आणि वन्यजीव यांची निगा राखणं आणि चांगलं असेल त्याची आस बाळगणं यांचा त्यात समावेश होतो.**

## भारताचे संविधान

## प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;<br>
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा<br>
व उपासना यांचे स्वातंत्र्य;<br>
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा<br>
आणि त्या सर्वांमध्ये

व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता<br>
आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा<br>
संकल्पपूर्वक निर्धार करून; आमच्या संविधानसभेस आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी (मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी, विक्रम संवत्सर दोन हजार सहा) याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.



Eighth Schedule

[Articles 344(1) and 351]

Languages

1. Assamese
2. Bengali
3. Gujarati
4. Hindi
5. Kannada
6. Kashmiri
7. Malayalam
8. Marathi
9. Oriya
10. Punjabi
11. Sanskrit
12. Tamil
13. Telugu
14. Urdu

(Rajendra Prasad)

Jawaharlal Nehru — B. Pattabhi Sitaramayya

Alladi Krishnaswami Iyer — Ammu Swaminadhan

T. Prakasam — K. Santhanam

G. Durgabai

222

डॉ. राजेंद्र प्रसाद, जवाहरलाल नेहरू आणि इतरांनी स्वाक्षरी केलेलं संविधानातलं पान

१९५० मध्ये आपले पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद, आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि इतर प्रतिनिधींनी संविधानावर स्वाक्षऱ्या केल्या.




प्रथम स्वाक्षरी केली जवाहरलाल नेहरूंनी. ते इतके आनंदातुर झाले होते की स्वाक्षरी करताना राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीसाठी त्यांनी जागाच सोडली नाही! मात्र राष्ट्रपतींनी पंडित नेहरूंच्या स्वाक्षरीच्या वरच्या जागेत आपली स्वाक्षरी माववली.



*भारतीय संविधानावर स्वाक्षरी करताना जवाहरलाल नेहरू*



**तर मग, राज्यघटना किंवा संविधान म्हणजे काय?**

देशाच्या लोकांनी मान्य केलेले विचार, नियम, आश्वासनं आणि कर्तव्य ज्यात आहेत, असं पुस्तक. नागरिकांना आवश्यक वाटलं, तर वेळोवेळी त्यात बदल करता येतात पण देशाचा हा सर्वांत महत्त्वाचा कायदा असल्यानं असे बदल सहजी, वरचेवर करता येत नाहीत.



१९४७ मध्ये, भारत जेव्हा ब्रिटिश राजवटीतून मुक्त झाला, तेव्हा, आपलं जीवन कशा प्रकारचं असावं असं आपल्याला वाटतं, आपल्याला कोणते अधिकार असावेत, आपली कर्तव्यं कोणती हे आपण ठरवलं. आपला राज्यकारभार कसा चालावा हेही आपण ठरवलं. आपले विचार एकत्रित करून आपण भारतीय राज्यघटनेत मांडले, त्या राज्यघटनेची सुरुवात प्रास्ताविकेने होते.

मला वाटतं, प्रास्ताविकेतले मोठे मोठे शब्द सुरुवातीला जरासे नवे वाटतील. पण ते समजून घेण्याचा प्रयत्न केला, की समजतील.



आता आपण प्रास्ताविका समजून घेऊया. ती सोप्या शब्दांत समजावायचा मी प्रयत्न करते.

**आम्ही भारताचे लोक :** यात भारतातल्या सर्व लोकांचा, म्हणजे मुलांचाही समावेश होतो.




वर्षभरात आपण
शंभराहून जास्त सण
उत्सव साजरे करतो.

(संकल्पपूर्वक निर्धार करून) :

आम्ही हे ठरवले आहे की आपण
सर्वजण मिळून **भारताला एक :**




**सार्वभौम :** आपल्याला काय करायचं आहे, हे आपण, भारताचे नागरिकच ठरवणार आणि काय करायचं हे दुसरा कुठला देश आपल्याला सांगू शकणार नाही.




काय करायचं हे जरी दुसरं कोणी आपल्याला सांगू शकत नसलं, तरीही व्यापार, शांतता राखणं, पर्यावरण बदलासारख्या समस्या सोडवण्यात सहकार्य अशा बाबतींत आपल्याला इतर देशांबरोबर करार करावे लागतात.

**समाजवादी :** म्हणजे देशाची संपत्ती देशवासियांनी निर्माण करायची आणि वाटून घ्यायची. प्रास्ताविकेत जेव्हा या शब्दाची भर घातली गेली, तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणाल्या, की समाजवाद म्हणजे भारतातल्या लोकांचं जीवन आणखी चांगलं करणं, सुधारणं.






**धर्मनिरपेक्ष :** भारतात आपण धर्मनिरपेक्षतेचा अर्थ असा लावतो, की कोणत्याही एका धर्माचं सरकार नसून सरकारनं एका धर्माला दुसऱ्या धर्मापेक्षा झुकतं माप देता कामा नये. सगळे धर्म, सगळ्यांच्या श्रद्धा यांच्याविषयी सारखाच आदर असायला हवा, आणि कोणता धर्म पाळायचा हे निवडायचं स्वातंत्र्य आपल्याला असायला हवं. शासकीय शाळांमध्ये एक विषय म्हणून धर्माचं शिक्षण देता येणार नाही.






८०% हून जास्त भारतीय
धर्मानं हिंदू आहेत.

सुमारे २००० वर्षांपूर्वी ख्रिश्चन धर्म
भारतात आला.

गेल्या १००० वर्षांहून अधिक काळ
मुस्लिम धर्म भारतात आहे.

शीख, बौद्ध, जैन यांसारख्या
धर्मांचा जन्म भारतात झाला.
बौद्ध धर्म भारतातून इतर
अनेक देशांत पसरला.



**लोकशाही गणराज्य घडविण्याचा :** म्हणजे राजा किंवा राणी नसलेलं सरकार. लोकांनी निवडून दिलेले लोकच लोकांच्या भल्याकरता ते सरकार चालवतात.







**आपले कायदे कोण करतं? सरकार कोण चालवतं?**

**आपले कायदे बनवण्यासाठी लोकांच्या ज्या गटाला आपण निवडून देतो त्या गटाला म्हणतात संसद (किंवा विधिमंडळ). भारतात लोकसभा, राज्यसभा आणि राष्ट्रपती मिळून संसद बनते. आपण लोकसभेसाठी, पुरुष आणि स्त्रिया मिळून ५४३ जणांना निवडून देतो. आणि न निवडलेले दोघंजण नेमले जातात. राज्यसभेसाठी आपण २३३ जणांना निवडून देतो. (निवडण्याची ही पद्धत जरा निराळी असते) आणि न निवडलेले बारा जण नेमले जातात. असे एकंदर ७९० संसद-सदस्य असतात. राज्य विधिमंडळांचे प्रतिनिधी व लोकसभा व राज्यसभा यांचे प्रतिनिधी मिळून राष्ट्रपतींची निवड करतात.**

वयाची अठरा वर्षे पूर्ण असलेला प्रत्येक भारतीय नागरिक निवडणुकीत मत देऊ शकतो आणि आपल्या देशाचे कायदे करणाऱ्यांना, कारभार चालविणाऱ्यांना निवडून देऊ शकतो. मग ती व्यक्ती स्त्री आहे की पुरुष,




तिच्याकडे किती संपत्ती आहे, ती किती शिकलेली आहे, तिची जात कोणती, धर्म कोणता, या कशाचाही मत देऊ शकण्यावर काही परिणाम होत नाही.

मत देणं म्हणजे एखादी व्यक्ती, वस्तू किंवा विचार यांची निवड करण्याची एक पद्धत.



मतदान जाहीर असू शकतं किंवा गुप्त. हात वर करून आपण संघाचा कप्तान निवडतो तेव्हा ते जाहीर मतदान असतं. कुणाला नाराज करण्याचं भय न बाळगता मत देता यावं, म्हणून, आपले कायदे बनवणाऱ्यांना निवडून देताना आपण गुप्त मतदान करतो.

संपूर्ण देशावर परिणाम करणाऱ्या विषयांवर संसद-सदस्य चर्चा करतात आणि नवीन कायदे तयार करून अवघड प्रश्न सोडवतात. सुचवलेल्या कायद्याला लोकसभा आणि राज्यसभा यांची मान्यता मिळाली, की अंतिम पाऊल म्हणजे राष्ट्रपतींची स्वाक्षरी. लोकसभेतल्या संसद सदस्यांच्या सर्वांत मोठ्या गटाचा नेता असलेली व्यक्ती सर्वसाधारणपणे भारताची पंतप्रधान होते. पंतप्रधान भारत-सरकारचे मुख्य असतात आणि ते मंत्र्यांची निवड करतात.

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, तमिळनाडू, अशा अनेक राज्यांमध्ये भारत विभागलेला आहे. (काही प्रदेश केंद्रशासित आहेत.) कायदे करण्यासाठी राज्यातही लोक निवडून दिले जातात. राज्यसरकारच्या प्रमुखाला म्हणतात मुख्यमंत्री, आणि ते राज्याचे मंत्री निवडतात. मंत्री सनदी अधिकाऱ्यांच्या मदतीनं सरकार चालवतात. काही गोष्टी भारत-सरकार करतं, काही गोष्टी राज्य-सरकारं करतात आणि काही गोष्टी दोघंही करतात. देशांतर्गत शांतता राखण्यासाठी पोलिस मदत करतात आणि सशस्त्र सेना, म्हणजे, भूदल, नौदल आणि वायुदल, सीमेवर शांतता राखण्यासाठी मदत करतात.

**आणि त्याच्या सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय (मिळवून देण्यासाठी) :** म्हणजे सर्व बाबतींत लोकांना प्रामाणिक आणि योग्य अशी वागणूक मिळायला हवी. (१) अवती भवतीची माणसं आपल्याशी नीट वागतात ना, (२) चरितार्थासाठी आपल्याला समान संधी मिळते ना,

(३) आपण मुक्तपणे मत देऊ आणि मिळवू शकतो ना - याचा त्यात अंतर्भाव होतो.



**'विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचं स्वातंत्र्य'** : म्हणजे वेगवेगळ्या गोष्टी करण्याचं स्वातंत्र्य - यात आपल्याला काय वाटतं ते खुलेपणानं बोलणं आणि लिहिणं, आवडेल तिथे राहणं याचं स्वातंत्र्य, आपली श्रद्धा आणि धर्म यांची निवड करण्याचं आणि त्यानुसार आचरण करण्याचं स्वातंत्र्य, प्रवास करण्याचं स्वातंत्र्य, इतरांना त्रास न देता गट करण्याचं स्वातंत्र्य या सगळ्याचा समावेश होतो.



**दर्जाची आणि संधीची समानता :** म्हणजे सर्व धर्मांच्या, कुठेही जन्मलेल्या, कोणत्याही वंशाच्या, जातीच्या, गरीब वा श्रीमंत अशा स्त्री-पुरुषांना सारखंच वागवणं. आपलं जीवन सुधारण्याची संधी या सर्वांना मिळायला हवी.




**आणि त्या सर्वांमध्ये**

**व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि अखंडता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा :** म्हणजे भाषा, धर्म, संस्कृती विविध असूनही सर्व भारतीयांचं एक कुटुंबच व्हावं यासाठी प्रोत्साहन मिळावं, त्यांनी एकमेकांची भावंडांसारखी काळजी घ्यावी, अशा प्रकारे भारत बलवान होण्यासाठी 'विविधतेतल्या एकतेची' गरज आहे.

**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी (मार्गशीर्ष शुक्ल सप्तमी, विक्रम संवत्सर दोन हजार सहा) **याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत: प्रत अर्पण करत आहोत** : २६ नोव्हेंबर १९४९ च्या संविधान सभेत ही राज्यघटना आम्ही स्वीकारत आणि स्वत:ला अर्पण करीत आहोत.




सरकार नीट काम करतं आहे की नाही याकडे लक्ष द्यायला कोण मदत करतं? न्यायालयं, प्रसारमाध्यमं आणि आपण सगळे.

कायदे पाळले जात आहेत आणि सगळ्या लोकांना समानतेची वागणूक मिळते आहे याविषयी दक्ष राहण्याचं काम भारताचं सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयं आणि त्याखालची विविध राज्यांमधली न्यायालयं करत असतात. जे न्यायालयातल्या विषयांची हाताळणी करतात आणि त्याबाबतचे निर्णय घेतात त्यांना न्यायाधीश म्हणतात. सचोटीने, योग्य प्रकारे, अन्याय होऊ न देता काम करणं हे त्यांचं कर्तव्य असतं.

देशात काय घडत आहे, सरकार काय करत आहे, काही सुधारणा कशा करता येतील हे आपल्याला प्रसारमाध्यमं सांगतात. प्रसारमाध्यमं म्हणजे टीव्ही, रेडिओ, इंटरनेट, वर्तमानपत्रं आणि मासिकं.

आपण स्वत: वाचनातून, लेखनातून, विविध विषयांवरच्या चर्चांमधून, बोलून समाजाचं मत तयार करू शकतो आणि योग्य त्या करण्यासाठी सरकारवर दबाव आणू शकतो. आपण निवडून दिलेले संसद सदस्य जर सचोटीनं भरपूर काम करत नसतील, तर निवडणुकीच्या वेळी आपण दुसऱ्या कोणाला तरी मत देऊ शकतो.

## आपण प्रास्ताविकेत फेरफटका मारून आलो. आपली घटना कशी लिहिली गेली ते आपण आता पाहू या.

९ डिसेंबर १९४६ ला, म्हणजे भारत स्वतंत्र होण्याआधी सुमारे आठ महिने, काही स्त्री-पुरुष नवी दिल्लीच्या एका सुंदर सजावट केलेल्या सभागृहात जमले. हे सभागृह म्हणजेच आत्ताचं, संसदभवनातलं मध्यवर्ती सभागृह. आपल्या विचारांविषयी चर्चा करण्यासाठी आणि संविधान म्हणजेच राज्यघटना लिहिण्यासाठी ते तिथे जमले होते.

संविधान लिहिण्यासाठी ते तिथे जमले होते म्हणून ती संविधानसभा. त्यांच्या खूप बैठका झाल्या, चर्चा झडल्या आणि त्यांच्यापैकी जवळजवळ सर्वांनी घटनेत म्हणजेच संविधानात असायला हवेत असे विचार मांडले. पण राज्यघटना लिहून काढणं, त्याचा खर्डा तयार करणं हे काम विशेष असल्यामुळे, जमलेल्या सगळ्यांमधून त्यांनी त्यासाठी एक लहान गट निवडला. या गटाचे प्रमुख होते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. साकल्यानं चर्चा करून घटना लिहून काढायला दोन वर्षं, अकरा महिने, सतरा दिवस लागले.

**संविधानाच्या म्हणजेच घटनेच्या तीन मूळ प्रती आहेत. त्यापैकी एक प्रत इंग्रजी हस्तलिखित आहे. शांतिनिकेतनच्या नंदलाल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली चित्रकारांच्या गटानं या प्रतीमध्ये सुंदर रेखाटनं केलेली आहेत. दुसरी इंग्रजीतील छापील प्रत आहे. तिसरी प्रत हिंदी हस्तलिखित आहे आणि त्यातली रेखाटनं चित्रकारांच्या दुसऱ्या एका गटानं केलेली आहेत. या तीनही प्रती नवी दिल्लीमध्ये संसदेच्या ग्रंथालयात, नियंत्रित तापमान असलेल्या जागी, काचेच्या कपाटात कुलूप लावून ठेवल्या आहेत. इतर प्रती इतरत्र पाहायला मिळतात. उदा : इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या ग्रंथालयात किंवा नवी दिल्ली इथल्या नेहरू मेमोरियल संग्रहालयाच्या ग्रंथालयात.**

## हे आपल्या संविधानकर्त्यांपैकी काहीजण :



### डॉ. राजेंद्र प्रसाद

३ डिसेंबर १८८४ ला बिहारमधल्या जिरादी या खेड्यात यांचा जन्म झाला. विद्यार्थी असतानाच त्यांची चमक दिसली आणि त्यांनी कायद्याच्या अभ्यासासाठी असलेलं सुवर्णपदक पटकावलं. त्यांच्यावर गांधीजींचा प्रभाव होता. स्वातंत्र्याच्या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. संविधानसभेचे ते अध्यक्ष होते. हे भारताचे पहिले राष्ट्रपती. त्यांची कारकीर्द दहा वर्षांची होती. २८ फेब्रुवारी १९६३ ला ते स्वर्गवासी झाले.



प्रत्येक राष्ट्रपती पाच वर्षांच्या कालावधीसाठी निवडले जातात. डॉ. राजेंद्रप्रसाद हे दोन वेळा निवडून आलेले एकमेव राष्ट्रपती. आपल्याकडे आतापर्यंत हिंदू, मुस्लिम आणि शीख राष्ट्रपती होऊन गेले आहेत. २००७ मध्ये प्रथमच राष्ट्रपतिपद एका स्त्रीनं भूषवलं.

## पंडित जवाहरलाल नेहरू :

१४ नोव्हेंबर १८८९ ला आत्ताच्या उत्तर प्रदेशात म्हणते तेव्हाच्या अलाहाबाद प्रांतात यांचा जन्म झाला. त्यांचं शालेय आणि महाविद्यालयाचं शिक्षण इंग्लंडला झालं. ते वकील बनले. भारतात परतल्यावर गांधीजींच्या स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला तेव्हा पहिले पंतप्रधान म्हणून त्यांची निवड झाली. जीवनाच्या अखेरपर्यंत, २७ मे १९६४ पर्यंत त्यांनी पंतप्रधान म्हणून जबाबदारी सांभाळली. एक देश म्हणून भारतात सुधारणा व्हाव्या यासाठी ते झटले. आणि म्हणून त्यांना आधुनिक भारताचे निर्माता असं म्हणतात. त्यांना लहान मुले फार आवडत, सगळे त्यांना कौतुकाने 'चाचा नेहरू' म्हणत. त्यांचा वाढदिवस 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो.



*गारपिटीमुळे ग्रस्त असलेल्या दिल्लीजवळच्या भागाला भेट दिली, तेव्हा शेतकऱ्यांच्या मुलांशी बोलताना जवाहरलाल नेहरू.*



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर



डॉ. भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म ४ एप्रिल १८९१ ला तेव्हाच्या मध्य प्रांतातील, आताच्या मध्य प्रदेशातील महूँ इथे झाला. त्यांचे वडील ब्रिटिशांच्या सैन्यात होते. अभ्यास करताना आंबेडकरांना पुष्कळ अडचणींवर मात करावी लागली. ते आणि आणखी काही मुलं 'अस्पृश्य' समजल्या जाणाऱ्या जातीतील असल्यामुळे त्यांना इतरांपासून दूर, वर्गाच्या बाहेर बसवलं जाई. शिक्षक त्यांना मदत करत नसत. इतर मुलांसाठी ठेवलेल्या पिण्याच्या पाण्याच्या कळशीला हात लावायलाही त्यांना परवानगी नव्हती.

आंबेडकर आधी मुंबईला गेले. तेव्हा मुंबईला 'बॉम्बे' म्हणत. नंतर ते शिक्षणासाठी इंग्लंडला आणि मग अमेरिकेला गेले. भारतात परतल्यावर त्यांनी वकिलीचं काम केलं.
'अस्पृश्यां'चं जीवन किती कठीण होतं, त्यांच्यावर कसा अन्याय होत होता हे ते कधीच विसरले नाहीत. या सगळ्याच्या मुळाशी असलेल्या जातिव्यवस्थेशी त्यांनी लढा दिला. समानता आणि बंधुता यावर त्यांचा गाढ विश्वास होता. घटना लिहिण्याच्या कामी त्यांची प्रेरणा फार महत्त्वाची होती. ते भारताचे पहिले कायदेमंत्री. १९५६ च्या ऑक्टोबरमध्ये त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला.
६ डिसेंबर १९५६ ला त्यांचं निधन झालं.

डॉ. आंबेडकरांना तेरा भावंडं होती. ते सर्वांत धाकटे.



## सरदार वल्लभभाई पटेल

३१ ऑक्टोबर १८७५ ला गुजरातेतील नडियाद इथे त्यांचा जन्म झाला. लहान असताना आपल्या वडिलांसोबत ते शेतावर कामाला जात. शिक्षणासाठी त्यांनी अपार परिश्रम केले आणि ते वकील झाले. गांधीजींकडून प्रेरणा घेऊन त्यांनी गुजरातेतील शेतकऱ्यांना ब्रिटिशांविरुद्धच्या अहिंसक चळवळींसाठी संघटित केले. ते भारताचे पहिले उपपंतप्रधान. भारतीय प्रजासत्ताकात विलीन व्हावे म्हणून त्यांनी पाचशेहून अधिक संस्थानांचा पाठपुरावा केला. कणखर व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांना पोलादी पुरुष म्हणत. १५ डिसेंबर १९५० ला त्यांचं निधन झालं.

## मौलाना अबुल कलाम मुहियुद्दिन अहमद



यांना मौलाना आझाद म्हणत. ११ नोव्हें. १८८८ ला आताच्या सौदी अरेबियात, मक्केला त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील उच्चशिक्षित मुस्लिम विचारवंत होते. मौलाना आझाद पत्रकार होते, त्यांनी एक उर्दू साप्ताहिक सुरू केलं. 'आझाद' हे त्यांचं टोपणनाव. त्याचा अर्थ स्वतंत्र. ते म्हणत, एखादी हिंदू व्यक्ती जशी अभिमानानं, 'मी भारतीय आहे' असं म्हणू शकते, तसंच मुस्लिम व्यक्ती किंवा ख्रिश्चन व्यक्तीही म्हणू शकते.
ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री होते. २२ फेब्रुवारी १९५८ ला ते निधन पावले.

सैन्यात नसलेल्या व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या किताबांपैकी 'भारतरत्न' हा सर्वोच्च बहुमानाचा किताब. हा पुरस्कार पिंपळपानाच्या आकाराचा असतो. २००८ पर्यंत एक्केचाळीस जणांना हा पुरस्कार दिला गेला, त्यापैकी फक्त पाच स्त्रिया होत्या. इथे ज्यांचं वर्णन केलं आहे, त्या सहाही पुरुषांना भारतरत्न देऊन गौरवलं गेलं. काही जणांना मरणोत्तर भारतरत्न दिलं गेलं.



## राजकुमारी अमृत कौर



२ फेब्रुवारी १८८९ ला उत्तर प्रदेशातील लखनौ इथं, तेव्हाच्या मध्य प्रांतात, यांचा जन्म झाला. त्या ख्रिश्चन होत्या. त्यांचं शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण इंग्लंडला झालं. भारतात परतल्यावर त्यांच्यावर गांधीजींचा खूप प्रभाव पडला. त्यांनी पुष्कळ वर्षं गांधीजींबरोबर जवळून काम केलं. त्या आरोग्यमंत्री झाल्या. स्वतंत्र भारतात मंत्री होणारी ही पहिली स्त्री. बालविवाह, बुरखा पद्धत (म्हणजे फारसं घराबाहेर जायचं नाही, चेहरा झाकून घ्यायचा) अशा चालीरीतींपासून समाज मुक्त व्हावा म्हणून त्या झटल्या. मुलांना आणि मुलींना समान वागणूक मिळायला हवी, सगळ्या मुलामुलींना शाळेत जाता यायला हवं अशी त्यांची इच्छा होती. २ ऑक्टोबर १९६४ ला त्यांचं निधन झालं.

## चक्रवर्ती राजगोपालाचारी



तमिळनाडूमधल्या सेलम जिल्ह्यातल्या थोरापल्ली नावाच्या गावी १० डिसेंबर १८७८ ला यांचा जन्म झाला. सगळे त्यांना सी आर किंवा राजाजी म्हणत. त्यांचं शिक्षण लहानशा शहरात झालं, आणि पुढे मद्रासच्या (चेन्नईच्या) प्रेसिडेन्सी कॉलेजात शिकले. स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. 'अस्पृश्यां'चं, दलितांचं जीवन सुधारावं यासाठी ते झटले. भारतीय असलेले ते एकमेव गव्हर्नर जनरल होते. आता राष्ट्रपती-भवन बनलेल्या राजेशाही इमारतीत ते अत्यंत साधेपणानं राहात. स्वत:चे कपडे ते स्वत:च धुवत, आपल्या बुटांना स्वत:च पॉलिश करत. विश्वशांतीवर त्यांचा अपार विश्वास होता. वयाच्या चौऱ्याण्णवाव्या वर्षी २५ डिसेंबर १९७२ रोजी त्यांची जीवनज्योत मालवली.

२६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेत राज्यघटनेला मान्यता मिळाली. आता हा दिवस कायदादिन म्हणून ओळखला जातो. २४ जानेवारी १९५० ला संविधान सभेच्या २८४ सदस्यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या.



दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० ला राज्यघटनेतले कायदे आपल्याला लागू झाले. या दिवसालाच आपण प्रजासत्ताक दिन म्हणतो. ब्रिटिशांपासून संपूर्ण स्वातंत्र्याची किंवा संपूर्ण स्वराज्याची मागणी जवाहरलाल नेहरूंनी केली त्याला या दिवशी बरोबर वीस वर्षे झाली होती.



*प्रजासत्ताक दिनाचे संचलन. पश्चिम बंगालच्या बाहुल्यांचा देखावा. पार्श्वभूमीला संसद-भवन.*



प्रास्ताविकेत काय म्हटलं आहे, ती कोणी लिहिली हे आपणं पाहिलं. तेच साध्या भाषेत इथे एका लांबलचक वाक्यात मांडलं आहे, फक्त 'लोक' या शब्दाच्या जागी 'मुलं' असा शब्द घातला आहे -

**आम्ही भारतीय मुलांनी** असा दृढ निश्चय केला आहे, की आम्ही भारताला, असं **स्वतंत्र लोकशाही राष्ट्र** बनवू की ज्या राष्ट्रात सर्व भारतीयांचं **जीवन अधिक चांगलं** असेल, ज्या राष्ट्रात एकाहून दुसरा धर्म श्रेष्ठ नसेल, **सर्व धर्मांचा जिथे आदर** केला जाईल आणि तिथे सर्वांना **न्यायाची आणि योग्य** वागणूक मिळेल,



विचार, कृती, हव्या त्या धर्माचं किंवा श्रद्धेचं पालन करणं यांचं **स्वातंत्र्य** असेल

आणि तिथे आम्ही सारे **समान** असू, आमचं जीवन सुधारण्याची समान संधी आम्हाला मिळेल,

परस्परांविषयीचं **प्रेम आणि आदर** यांची आम्ही जोपासना करू म्हणजे एकोप्याने राहू आणि देशाची काळजी वाहू;

**आता आम्ही स्वत:ला ही राज्यघटना अर्पण करीत आहोत.**



## काय करायला हवं?

आपल्याला संविधान म्हणजेच राज्यघटना मिळाली त्याला ६० पेक्षा अधिक वर्षं पूर्ण होऊन गेली, पण घटनेनं दिलेली आश्वासनं पूर्ण करायला आपल्याला अजूनही झटायला हवं.

घटनेनुसार प्रत्येक भारतीय मुलाला अन्न, आरोग्य आणि शिक्षण यांचा अधिकार आहे. पण ज्यांना पुरेसं खायलाही मिळत नाही अशी गरीब मुलं आहेत. काहीजण आजारी आहेत. काहींना लिहिता-वाचता येत नाही. काहींना नाइलाजानं काम करावं लागतं. आपल्या बहीण-भावंडांचं आयुष्य जर सुधारलं नाही तर मग आपण समान कसे? आपण योग्य असं, प्रामाणिकपणे वागायला हवं आणि **सगळ्यांचंच** जीवन सुधारण्यासाठी धडपड करायला हवी.



गांधीजी एकदा म्हणाले होते, ''जो बदल बाहेर घडावा असं वाटत असेल तो आधी आपल्यात घडवायचा.'' आपल्या भोवतालच्यांनी बदलावं असं आपल्याला वाटत असेल तर आपण आधी स्वत:ला बदलायला हवं. इतरांनी जसं चांगलं, सहृदय, न्याय्य, प्रामाणिक, धैर्यवान असावं असं आपल्याला वाटतं, तसं आधी आपण व्हायला हवं.

आपण खात्रीशीरपणे एकमेकांना मदत केली, एकमेकांवर प्रेम केलं तर भारतासारखं शांत, आनंदी ठिकाण दुसरं नाही! आपण जिथे राहतो, ज्या ठिकाणांना भेटी देतो, त्या जागांचीही आपण काळजी घ्यायला हवी. आपली गावं, रानं-वनं, तळी आणि नद्या या सगळ्यांचीच. मगच आपण, ''सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा'', असं अभिमानानं म्हणू शकू.



## अखेरीस...

प्रास्ताविकेचा गाभा लक्षात राहावा यासाठी ही छोटी कविता -

होऊ स्वतंत्र, न्यायी, समान
अपुल्या विविधतेत बलवान
मुक्त विचार नि मुक्त प्रार्थना
पाहू मुक्तपणे स्वप्नांना
साहस मुक्तपणाने करू
हृदयी माया, प्रेम धरू
होऊ स्वतंत्र, न्यायी, समान
अपुल्या विविधतेत बलवान

स्वतंत्र, न्यायी, समान होऊ
विश्वासासह प्रेमही देऊ
देऊ दुर्बलास मदतीचा हात
येवो बळ या दोन्ही करांत
मदत करू, समजुन घेऊ
आनंदी देशा घडवू
होऊ स्वतंत्र, न्यायी, समान
अपुल्या विविधतेत बलवान



हे चित्र नंदिनी सेठनं काढलं आहे.

# Read India

प्रथम बुक्सची स्थापना २००४ मध्ये झाली. मुलांच्या वाचनाला चालना देण्यासाठी, 'रीड इंडिया' नावाचा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर सुरू झाला होता. त्याच चळवळीचा एक भाग म्हणून ही स्थापना झाली. प्रथम बुक्स ही अनेक भारतीय भाषांमध्ये, दर्जेदार पुस्तकं प्रकाशित करणारी ना-नफा संस्था आहे. 'प्रत्येक मुलाच्या हाती पुस्तक' हे आमचं ध्येय असून, त्याद्वारे भारतातल्या सर्व मुलांपर्यंत वाचनाचा आनंद पोहोचवायचा आहे. यात कोणत्याही प्रकारे सहभागी होण्यासाठी info@prathambooks.org या पत्त्यावर इमेल पाठवा.

---

लीला सेठ या दिल्ली उच्च न्यायालयातील पहिल्या स्त्री-न्यायाधीश. भारतातील एका राज्यात मुख्य न्यायाधीश बनणारी ही पहिलीच स्त्री. १९९२ मध्ये हिमाचल प्रदेशाच्या मुख्य न्यायाधीश म्हणून त्या निवृत्त झाल्या. भारताच्या १५व्या कायदा सुधार समितिच्या त्या सदस्य होत्या. मानवी हक्कांशी निगडित अशा कामांशी, अनेक शाळांशी आणि महाविद्यालयांशीही त्या जवळून जोडलेल्या आहेत. त्यांनी मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचे प्रशिक्षण घेतले आहे. *ऑन बॅलन्स* हे त्यांचे आत्मचरित्र २००३ मध्ये प्रकाशित झाले.

बिंदिया थापर या प्रशिक्षणाने वास्तुरचनातज्ज्ञ होत्या आणि त्या आवडीखातर रेखाटने करत. मुलांसाठी वैविध्यपूर्ण चित्रं काढणाऱ्या म्हणून प्रसिद्ध होत्या.

माजी मुख्य न्यायाधीश लीला सेठ संविधानाच्या प्रास्ताविकेचे शब्द असे समजावून सांगतात की लहानग्या वाचकांनाही ते कळावेत. लोकशाही गणराज्य म्हणजे काय, आपण निधर्मी आहोत म्हणजे काय, सार्वभौम म्हणजे काय? इत्यादि. कितीही लहान वयात मुलं घटना म्हणजे काय हे समजून घेऊ शकतात असं त्यांना वाटतं. या संकल्पना त्या मोठ्या खुबीनं हाताळतात आणि सर्वांना समजेल, समजून घेताना मजा येईल अशा प्रकारे समजावतात. अनेक छायाचित्रांची जोड, प्रसिद्ध चित्रकार बिंदिया थापर यांची पकड घेणारी, प्रेरक चित्रं आणि गमतीशीर छोट्या गोष्टी या सगळ्यामुळे 'आम्ही भारतीय मुले' प्रत्येक बाल नागरिकानं वाचायलाच हवं.

टप्प्याटप्प्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे.

**१ प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी**

वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोटुकल्यांसाठी.

**२ वाचायला शिकणे**

ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.

**३ स्वतंत्रपणे वाचन**

आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.

**४ सराईतपणे वाचन**

आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते
www.prathambooks.org

We, the Children of India
(Marathi)
MRP: ₹ 110.00

ISBN 978-81-8479-437-3
9 788184 794373